LINTAS
LINOPINION PUBLIC RELATIONS

| PUBLICATION | MUMBAI LAKSHDEEP |
|---|---|
| EDITION | MUMBAI |
| DATE | 02-08-2010 |
| PAGE NO | 06 |


# पॉलिफ्लेक्सचा इटलीच्या मॅग्निफ्लेक्स एस.पी.ए.सोबत भागीदारी



पॉलिफ्लेक्स, बेजोड असे वैज्ञानिक आणि आरामदायक निद्रा उत्पादनांमध्ये हातखंडा असलेल्या कंपनीने इटलीची सर्वात मोठी उत्पादक कंपनी मॅग्निफ्लेक्ससोबत एक्स्लूजीव करार केला असून याद्वारे ती मॅग्निफ्लेक्सचे विस्तृत आणि वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांचे मार्केट आणि विक्री करणार आहे. लाँचप्रसंगी बोलताना बलराम भिवानी, अध्यक्ष, पॉलिफ्लेक्स म्हणाले, भारतातील ग्राहकांना निद्रा आणि आराम करण्याचा जागतिक दर्जाचा अनुभव मिळवून देणे हे या निद्रा उत्पादनांच्या क्षेत्रातल्या दोन आघाडीच्या कंपन्यांदरम्यान झालेल्या करारचे उद्दिष्ट्य आहे. मॅग्निफ्लेक्स हे नामांकित ब्रॅण्ड असून त्यांच्याजवळ सर्वोत्तम तंत्रज्ञान असून भारतात एकत्रितपणे आमच्या उत्पादनांसाठी चांगले परिणाम साधण्याची आम्ही अपेक्षा करतोय.

भागीदारीविषयी प्रतिक्रिया देताना मार्को मॅग्नि, ग्लोबल सेल्स मॅनेजर मॅग्निफ्लेक्स म्हणाले, भारतीय बाजारपेठेत प्रवेश करताना आम्हाला अतिशय आनंद झाला असून आमच्यासाठी ही बाजरपेठ अतिशय महत्त्वाची आहे. भागीदारीमधून आम्हाला चांगले परिणाम मिळतील. अशी आम्ही अपेक्षा करत असून पॉलिफ्लेक्स हा भारतात गणला गेलेला ब्रॅण्ड आहे. आम्ही दीर्घकालीन संबंधावर विश्वास ठेवत असून बाजारपेठेला सर्वोत्तम देण्यासाठी पॉलिफ्लेक्स सोबत एकत्रित काम करून भविष्यात चांगले परिणामांची आशा ठेवतो.

ब्रॅण्ड पॉलिफ्लेक्सची आघाडीची कन्झूमर ड्युरेबल कंपनी होण्याची इच्छा असून या श्रेणीत ग्राहकांच्या आवडीचे ब्रॅण्ड होण्यासाठी उच्च प्रतिचे उत्पादन सादर करते. कंपनी जलदगतीने वाढत असलेल्या 'स्लीप प्रॉडक्टस्' उद्योगात प्रवेश करत असून निद्रा, आरोग्य आणि सक्रिय आराम अशी एकिकृत संकल्पना अंगीकारते. दर्जा उंचावलेल्या आरामाद्वारे याची निद्रा व्यवस्था जीवनाच्या दर्जामध्ये महत्त्वाचे योगदान सादर करून अद्वितय अशी संपूर्ण आराम शीर निद्रा देऊन तुमच्या आरोग्यामध्ये योगदान देत.

पॉलिफ्लेक्स एन्टरप्राईजद्वारे भारतात मॅग्निफ्लेक्सची उत्पादने सादर करण्यात येत आहे. इटलीमध्ये या विभागात मॅग्निफ्लेक्सही सर्वात मोठी कंपनी आहे. मॅग्निफ्लेक्स मॅट्रेसेस या सर्वाधिक निद्रा सुसंगत असून त्यात आरामदायकपणाचा सखोल पाठबळाशी संयोग घडवला गेला आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या बाजारपेठेला लक्ष करून कंपनी निद्रा आणि आराम करण्यासाठी मॅट्रेसेस आणि ॲस्सेसरीजचे उत्पादन करते. प्रस्तुत विस्तृत आणि वैविध्यपूर्ण उत्पादने ही दर्जेदार निद्रा आणि आराम करण्याची इच्छा असलेल्या ७० देशांमधल्या ग्राहकांची निकड भासवते. मॅग्निफ्लेक्सची उत्पादने १०० टक्के इटलीतच बनविली जातात. ते सर्वोत्तम असे मटेरियल वापरत असून उच्च दर्जाचा धागा आणि फोमचा वापर करून त्यांची उत्पादने तयार केली जातात. मॅग्निफ्लेक्स मॅट्रेसेस या व्हॅक्यूम पॅक्ड असून मॅग्निफ्लेक्सकडे व्हॅक्यूम कॉम्प्रेशन टेक्नॉलॉजीचे जागतिक पेटंट आहे.